# कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषि तंत्रज्ञान दिवस तथा शेतकरी शास्त्रज्ञ मंच बैठक संपन्न

कृषि विज्ञान केंद्र, धुळे कृषि महाविद्यालय, धुळे व आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने ''कृषि तंत्रज्ञान दिवस'' कृषि विज्ञान केंद्र प्रक्षेत्रावर संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालय, धुळे चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चितामणी देवकर, होते, प्रमुख पाहुणे म्हणून आत्मा, धुळे प्रकल्प संचालक श्री. शांताराम मालपुरे होते. त्यासोबतच व्यासपिठावर कृषि भूषण प्रगतशिल शेतकरी ॲड. प्रकाश पाटील तसेच सेंद्रिय शेती उत्पादक कृषि भुषण श्री. दिलीप पाटील, डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृ.वि.कें., धुळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शेतकरी तसेच देसी पद्विका कार्यक्रमाचे कृषि निविष्ठा विक्रेते उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्तावीक डॉ. दिनेश नांद्रे कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांनी केले. यामध्ये कृषि तंत्रज्ञान दिवसाचे महत्व व उद्देश स्पष्ट केले. त्यासोबतच  कोवीड -१९ परिस्थितीमध्ये कृषि विज्ञान केंद्राद्वारे राबवित असलेल्या उपक्रमाविषयी विसृत माहिती उपस्थितींना करुन दिली तसेच प्रक्षेत्रावर राबविण्यात आलेल्या उपक्रमाविषयी यामध्ये प्रामुख्याने पिक प्रात्यक्षिक प्रक्षेत्र उपस्थितांना दाखविण्यात आले यात एकूण प्रमुख २० विविध पिकांचे ५६ वाणांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

यानंतर कृषि भूषण ॲड.प्रकाश पाटील यांनी त्यांच्या मनोगतामध्ये कृषि विज्ञान केंद्र व कृषि विभाग यांचा समन्वय साधुन किफायतशिर शेती माल उत्पादन घेण्याकडे जास्तीत जास्त तरुणांनी सहभागी व्हावे असे मत त्यांनी मांडले व कृषि विज्ञान केंद्राच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.  यांनतर कृषि भुषण शेतकरी व कृषि विज्ञान केंद्र, धुळे शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री दिलीप पाटील यांनी, सेंद्रिय शेतीमध्ये पारंपारिक तंत्रज्ञानाची शेतावरील चाचणी प्रयोग घेण्यावर भर दिला. ते म्हणाले कि, सेंद्रिय शेतीचे प्रबोधन करत असतांना अनेक पारंपारिक ज्ञानावर आधारीत सेंद्रिय उत्पादनांचा ते त्यांच्या शेतावर प्रयोग करत असतात. याच प्रमाणे जिवामृताचा विविध पिकावर केलेले यशस्वी प्रयोगांबाबत त्यांनी उपस्थितांना माहिती दिली.

आत्मा प्रकल्प संचालक श्री. शांताराम मालपूरे यांनी कृषि विभागातील व आत्मा कार्यालया मार्फत राबवण्यात येणा-या विविध कृषि व कृषिपुरक योजनांची माहिती दिली. त्यांनी कृषि विज्ञान केंद्र कृषि विस्तारामध्ये होत असलेल्या परिश्रमांचे कौतुक केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. चिंतामणी देवकर यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे शेती व शेतीपुरक व्यवसायामधील योगदान या विषयी माहिती उपस्थितांना करुन देत ते म्हणाले कि, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी ने काही महत्वाच्या पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारातून शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट केले आहे. या मध्ये उस पिकाचा को. २६५ वाणाद्वारे शेतक-यांना ४०,००० कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. तसेच डाळींब भगवा, आरका,

मृदुला या वाणांपासून २१००० कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. हे सर्व प्रगतशील व प्रयोगशील शेतक-यांनी विद्यापीठाने विकसीत केलेल्या नव नवीन तंत्रज्ञानाचा आपल्या शेतावर अवलंब केल्यामुळे शक्य झाले आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. रोहित कडू विषय विशेषज्ञ (उद्यान विद्या) कृ.वि.कें., धुळे व आभार प्रदर्शन प्रा. श्रीधर देसले यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता कृषि विज्ञान केंद्राचे अधिकारी कर्मचारी, कृषि महाविद्यालयाचे अधिकारी कर्मचारी तसेच आत्मा कार्यालय, धुळे यांचे सहकार्य लाभले.



पिक प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर तंत्रज्ञान माहिती सांगतांना डॉ. दिनेश नांद्रे व उपस्थित प्रमुख मान्यवर व शेतकरी